# वर्सोवा-विरार सी-लिंकला संपूर्ण सहकार्य

## जपानचे मंत्री निशिमुरा यांचे देवेंद्र फडणवीस यांना आश्वासन

टोकियो, ता. २४ : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जपानचे केंद्रीय आर्थिक, व्यापार आणि उद्योगमंत्री यासुतोशी निशिमुरा यांची भेट घेतली. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, मेट्रो-३ प्रकल्पातील अडथळे दूर केल्याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानतानाच वर्सोवा-विरार सी-लिंकला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन जपान सरकारच्या वतीने दिले. फडणवीस यांचा आजचा जपान दौऱ्याचा चौथा दिवस आहे.

जपान 'जी-७'चे नेतृत्व करीत असून भारत 'जी-२०'चे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे हे दोन देश जागतिक पातळीवर मोठी भूमिका बजावू शकतात. जपान सरकार सातत्याने नवीन संशोधनाला चालना देत असल्याचे जपानचे आर्थिक, व्यापार आणि उद्योगमंत्री यासुतोशी निशिमुरा म्हणाले; तर महाराष्ट्र हे उद्योगांचे 'पॉवर हाऊस' आहे. सुमारे ७५० जपानी कंपनी महाराष्ट्रात आहेत.



देवेंद्र फडणवीस यांनी जपानच्या दौऱ्यात विविध मान्यवरांची भेट घेतली.

### व्हाईस गव्हर्नर निशिगाकी यांची भेट

इशिकावाचे व्हाईस गव्हर्नर अतूको निशिगाकी यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सुपा इंडस्ट्रियल पार्कमध्ये गुंतवणूक करण्याचा मनोदय व्यक्त केला. जपान गुंतवणूकदारांचे शिष्टमंडळ घेऊन आपण स्वतः महाराष्ट्रात यावे, असे निमंत्रण फडणवीस यांनी त्यांना दिले. त्यावर आपण २०२४ आरंभी महाराष्ट्रात येऊ, असे त्यांनी आश्वस्त केले. महाराष्ट्राचे एक चमू गुंतवणूक संधी सांगण्यासाठी इशिकावा येथे पाठविण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

### विविध मान्यवरांच्या भेटी

जपान दौऱ्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एनटीटी डेटाचे उपाध्यक्ष हिदेएकी ओझाकी, जायकाचे वरिष्ठ उपाध्यक्ष नाकाझावा केईचिरो, जपानच्या पंतप्रधानांचे विशेष सल्लागार मासाफुमी मोरी, जपानमधील सर्वात मोठी आणि सुमारे ३० टक्के वीज उत्पादन करणाऱ्या जेरा कंपनीचे कार्यकारी अधिकारी युचिरो काटो आदींची भेट घेतली.